नांदेड वार्ता दि. 8.10.25

# किनवटमध्ये घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक



नांदेड/प्रतिनिधी-किनवट शहरात दोन ठिकाणी घरफोडी करणाऱ्या करण संगेवाड रा.बोधडी यास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली असून त्याच्याकडून २ लाख ९३ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

किनवट जवळ असलेल्या गोकुंदा भागातील सिध्दार्थनगर व आयप्पा स्वामी नगर या ठिकाणी दोन महिन्यांपूर्वी घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचारी हे आज (मंगळवार) सकाळी इतवारा उपविभागात गस्त घालीत असतांना एक तरुण सोन्याचे दागिणे विक्रीसाठी इतवारा भागात आल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलीसांनी दागिणे घेवून संशयास्पद फिरणाऱ्या करण लोच्या संगेवाड (वय १९) रा.बोधडी रेल्वेस्टेशन, ता.किनवट यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळून सोन्याचे दागिणे, रोख रक्कम व मोबाईल असा २ लाख ९३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी त्याची अधिक चौकशी केली असता त्याने गोकुंदा भागातील सिध्दार्थनगर व आयप्पा स्वामी या ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली. चोरीच्या घटनेतील सोन्याचे दागिणे विक्रीसाठी आपण इतवारा भागातील सराफा मार्केट मध्ये आलो होतो असे सा

सदरील आरोपीकडून घरफोडीच्या घटना उ

येण्याची शक्यता आ